परराष्ट्र सचिवांची पॅरिस, फ्रान्सला भेट (09-10 नोव्हेंबर 2026)

भारताचे परराष्ट्र सचिव श्री. विक्रम मिस्त्री यांनी 09-10 नोव्हेंबर 2026 दरम्यान पॅरिस, फ्रान्सला औपचारिक भेट दिली.

2. या भेटीदरम्यान, परराष्ट्र सचिवांनी फ्रान्सच्या युरोप आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सरचिटणीस, श्री. मार्टिन ब्रायन्स यांच्यासोबत 3ऱ्या भारत-फ्रान्स धोरणात्मक अंतराळ संवादाचे सह-अध्यक्षपद भूषवले. उभय बाजूंनी दुसऱ्या भारत-फ्रान्स धोरणात्मक अंतराळ संवादापासून झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला आणि अंतराळ क्षेत्रातील चालू असलेल्या मजबूत द्विपक्षीय सहभाग आणि G2G आणि व्यावसायिक विभागांमध्ये पुढील सहकार्याच्या मार्गांवर चर्चा केली.

3. परराष्ट्र सचिव आणि सरचिटणीस मार्टिन ब्रायन्स यांनी भारत-फ्रान्स आर्थिक सुरक्षा आणि महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान संवादाच्या उद्घाटन बैठकीची सह-अध्यक्षता भूषविली. जून 2026 मध्ये पंतप्रधानांच्या फ्रान्स भेटीदरम्यान ही संवाद यंत्रणा स्थापन करण्यात आली. या चर्चेत पुरवठा साखळीतील भेद्यता, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान, सायबर सिक्युरिटी आणि धोरणात्मक पुरवठ्याचे संरक्षण यावर चर्चा झाली. उभय बाजूंनी असे नमूद केले की, हा संवाद नवोपक्रम रोडमॅप 2030, भारत-फ्रान्स नवोपक्रम वर्ष, विद्यमान आर्थिक आणि वित्तीय संवाद तसेच पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याच्या उद्दिष्टाला पूरक आहे. त्यांनी संवादादरम्यान ओळखलेल्या प्राधान्यांवर काम करण्यास सहमती दर्शविली.

4. परराष्ट्र सचिवांनी आपल्या भेटीदरम्यान, सरचिटणीस ब्रायन्स यांच्यासोबत भारत-फ्रान्स विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारीचा आणि हॉरिझॉन 2047 रोडमॅपच्या अंमलबजावणीचा सर्वसमावेशक आढावा घेतला. त्यांच्या चर्चेमध्ये द्विपक्षीय सहकार्याच्या प्रमुख क्षेत्र तसेच भारत-युरोपियन संघ संबंधांचा समावेश होता. बहुपक्षीय मंचांवर परस्पर हित आणि सहकार्याच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही उभय बाजूंनी विचारांचे आदान-प्रदान केले.

5. ही भेट भारत आणि फ्रान्स दरम्यान निरंतर उच्च-स्तरीय आदान-प्रदान आणि उभय बाजूंची त्यांची विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी सामायिक वचनबद्धता प्रतिबिंबित करते.

पॅरिस

10 नोव्हेंबर 2026